महा मेट्रो

PUNE METRO

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

(पुणे मेट्रो रेल प्रकल्प)

**"कसबा पेठ येथील नियोजित मेट्रो स्टेशनमुळे शहरातील मुख्य भागांतील नागरिकांना लाभ"**

पुणे २७ : मध्य भारतातील सर्वात मोठे व प्रगत शहर आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रात पुण्याचे महत्व वरचढ असल्याने येथील शहरीकरणाचा वेग प्रचंड आहे. आयटी,शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रामध्ये पुणे शहराचे नाव उच्च स्तरावर घेतल्या जाते. पायाभूत सुविधा, वाहने यांच्या वाढत्या संखेने येथे प्रचंड गर्दी झाली आहे. परिणामतः प्रदूषण, वाहतुकीची कोंडी यासारखा त्रास वाढतच चालला आहे. यावर ठोस उपाय म्हणून पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प येथे आणण्याचा मानस शासनाने घेतला. महा मेट्रोच्या पुणे मेट्रो रेल प्रकल्पामध्ये सिव्हील कोर्ट ते स्वारगेट मेट्रो स्टेशन पर्यंतचा मार्ग हा अंडरग्राउंड असून कसबा पेठ या ठिकाणी मेट्रो स्टेशन नियोजित करण्यात आले आहे. या स्टेशमुळे कसबा पेठ या शहराच्या मुख्य भागातील नागरिकांना जलद वाहतूक सेवेच्या जाळ्याशी जोडले जाणार आहे. या स्टेशनमुळे नागरिक,दुकानदार, रहिवाशीयांना जलद वाहतुकीची सुविधा मिळणार असून व्यापार उद्यमवाढण्यात मदतच होणार आहे. स्थानिक नागरिक,दुकानदार,भूखंडधारक यांनी सदर मेट्रो स्टेशनच्या निर्माण कार्या बाबत महा मेट्रो विविध माध्यमांद्वारे संपर्क साधून प्रश्न समजावून घेण्याचा प्रयत्न करत आहे.

महा मेट्रो द्वारे स्थानिक नागरिकांशी वेळोवेळी समन्वय साधून चर्चा करत आहे. स्थानिक नागरिकांच्या प्रकल्पाशी सबंधित प्रश्नांचे निराकरण करण्याकरिता मेट्रो संवाद चे आयोजन देखील करण्यात आले. प्रकल्प बांधिताना शासनाच्या व महा मेट्रोच्या

तरतुदीनुसार कुठले लाभ देय होत आहे याबद्दल वेळोवेळी माहिती स्थानिका नागरिकांना बैठकीद्वारे देण्यात येत आहे. शिवाय अधिग्रहण संदर्भात (जमीन व अधिग्रहण विभाग) द्वारे वैयक्तिक पत्रे नागरिकांच्या (प्रकल्प बांधिकांच्या)पत्यावर पाठविण्यात आली. (पाठविलेल्या पत्रामध्ये : नुकसान भरपाई, पुनर्वसन व पुनर्स्थापनादेय लाभ बद्दल सविस्तर माहिती पुरविण्यात आली.) तसेच सविस्तर माहिती महा मेट्रोच्या वेबसाईट वर देखील दर्शविण्यात आली आहे. महा मेट्रोने नुकतेच कसबा पेठेतील दादोजी कोडदेव शाळेत कार्यालय उघडले असून तेथील नागरिकांना मेट्रोसंबंधी माहिती देण्यात सुरुवात केली आहे. महा मेट्रोने कसबा पेठ मेट्रो स्टेशनमुळे विस्थापित नागरिकांचे पुनर्वसनासाठी दादोजी कोंडदेव शाळा व भाऊ कोतवाल मंडई येथे महा पालिकेकडून जागा मागितली आहे. ह्या दोघेही जागा विस्थापित नागरिकांसाठी अत्यंत जवळ असून त्यामुळे एका सर्व सुविधायुक्त नियोजित जागेत पुर्नवसन होणार आहे.

महा मेट्रोने दादोजी कोंडदेव शाळा व भाऊ कोतवाल मंडई येथील पुनर्वसनाची इमारतींचे आराखडे बनविले असून, विस्थापित नागरिकांनी त्यांचे स्वागत केले आहे. हे आराखडे घेऊन महा मेट्रो जास्तीत विस्थापित नागरीकांबरोबर एकास एक मिटिंग घेत असून सर्व माहिती जसे; जमीन मालकांना किती भरपाई मिळेल व भाडेकरुंना किती भरपाई मिळेल याची निश्चित माहिती देण्यात येत आहे. महा मेट्रो सर्व प्रकल्प विस्थापितांबरोबर लवकरात लवकर संपर्क साधून परिस्थितीची पूर्ण कल्पना देत आहे. कसबा पेठेतील नागरिकांनी अधिक संपर्कासाठी श्री. प्रल्हाद कचरे(९४२२७ ५०४६४) श्री. भिवाजी पराड (९४२२० ८७०९१) यांच्याशी संपर्क साधावा.